भारत निवडणूक आयोग

निर्वाचन सदन, अशोक मार्ग, नवी दिल्ली ११० ००१

ईसीआस/पीएन/१००/२०२२ दिनांक २९ डिसेंबर २०२२

प्रसिद्धीपत्रक

देशांतर्गत स्थलांतरण करणाऱ्या स्थलांतरित मतदारांसाठी दूरस्थ मतप्रणाली राबविण्याची निवडणूक आयोगाची तयारी ; त्यामुळे स्थलांतर करणाऱ्या मतदाराने मतदान करण्यासाठी आपल्या गृह राज्यात जाण्याची आवश्यकता नाही

भारत निवडणूक आयोगाने बहु – मतदारसंघीय दूरस्थ इलेक्ट्रोनिक मतदान यंत्राचा (RVM) नमुना विकसित केला आहे ; सदर दूरस्थ इलेक्ट्रोनिक मतदान यंत्राच्या प्रात्यक्षिकासाठी राजकीय पक्षांना निमंत्रण देत आहे.

दूरस्थ इलेक्ट्रोनिक मतदान यंत्रामुळे एकाच दूरस्थ मतदान केंद्रावरून अनेक मतदारसंघातील मतदान हाताळता येणार

याबाबतच्या कायदेशीर, परीचालानात्मक , प्रशासकीय व तंत्रज्ञान विषयक आव्हानांबाबत भारतीय निवडणूक आयोगाने संकल्पना दस्तऐवज तयार केला असून सदर दस्तैवजावर आयोगाने राजकीय पक्षांचे अभिप्राय मागविले आहेत.

आजच्या तंत्रज्ञानावर आधारित युगात स्थलांतरामुळे मतदान अधिकारापासून वंचित ठेवणे हा पर्याय होऊ शकत नाही. सन २०१९ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत सुमारे ६७.४ % इतके मतदान झाले होते. म्हणजेच सुमारे ३० कोटीच्या पेक्षा जास्त मतदार आपला मतदानाचा अधिकार बजावत नाहीत तसेच भिन्न राज्यांमध्ये मतदानाच्या विभिन्न आकडेवारीबाबत भारतीय निवडणूक आयोगाने आपली चिंता वेळोवेळी व्यक्त केली आहे. असे मानले जाते की, मतदाराची आपल्या नविन निवासस्थानाच्या जागी मतदार म्हणून नाव नोंदणी न करण्याची बहुविध कारणे असून त्यामुळे तो मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहतो. अंतर्गत स्थलांतरामुळे मतदान करण्यास असमर्थता हे मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी आणि निवडणूकांचे स्वरुप अधिकाधिक प्रतिनिधीक करण्यासाठीच्या प्रयत्नातील एक प्रमुख अडचण असून त्या प्रमुख कारणाचे निराकरण करणे आवश्यक आहे. देशांतर्गत स्थलांतराबाबत कोणत्याही प्रकारचा केंद्रीभूत माहितीसाठा उपलब्ध नसला तरीही नोकरी, शिक्षण व विवाहामुळे होणारे स्थलांतर हा देशांतर्गत स्थलांतराचा प्रमुख घटक असल्याकडे सार्वजनिक संस्थळावर उपलब्ध असलेली विविध प्रकारची माहिती अंगुलीनिर्देश करीत आहे. एकूण देशांतर्गत स्थलांतराचा विचार केल्यास ग्रामीण

भागातील लोकसंख्येचे बाह्य स्थलांतर मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे आढळते. सुमारे ८५ % स्थलांतर हे राज्यांतर्गत होत असल्याच आढळून येते.

मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून सूत्रे हाती घेतल्यावर लगेचच मुख्य निवडणूक आयुक्त श्री कुमार हे चामोली जिल्ह्यातील दुमक गावापासून दुरस्थ मतदान केंद्राच्या आपल्या पायी यात्रेमध्ये देशांतर्गत स्थलांतरणाच्या समस्येशी थेट अवगत झाले व त्याप्रती त्यांनी आपले लक्ष स्थलांतरित मतदारांना त्यांच्या निवासस्थानाच्या सध्याच्या ठिकाणावरुन आपला मतदानाचा अधिकार कसा बजावता येईल यावर केंद्रित केले. अशा प्रकारच्या सबलीकरणामध्ये अनेक प्रकारच्या कायदेशीर, परीचालानात्मक , प्रशासकीय व तंत्रज्ञान विषयक अंतरनिरासनांची आवश्यकता लक्षात घेऊन, सर्व आर्थिक - सामाजिक स्तारातील स्थलांतरितांना मतदानामध्ये सुलभतेने सहभागी होता यावे यासाठी द्विमार्गी प्रत्यक्ष डाकेद्वारे मतदान, प्राधिकृत प्रतिनिधीद्वारे मतदान, विशेष मतदान केंद्रांमध्ये नियोजित दिनांकाच्या अगोदर स्थलांतरित मतदारांचे मतदान, डाकेद्वारे मतदानाचे एकेरी किंवा दुहेरी पद्धतीने प्रेषण, महाजाल ( इंटरनेट ) आधारित मतदान इत्यादी अशा अनेक पर्यायांचा भारतीय निवडणूक आयोगाने याबाबत नेमलेल्या समितीने सखोल विचार केला.

सर्व हितसंबंधीयांना विश्वासार्ह , अभिगम्य व मान्य होईल असे तंत्रज्ञानावर आधारित उपाय शोधण्याच्या उद्दिष्टाने मुख्य निवडणूक आयुक्त श्री राजीव कुमार याच्या नेतृत्वाखाली अन्य निवडणूक आयुक्त श्री अनुपचंद्र पांडे व श्री अरुण गोयल यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक आयोगाने दूरस्थ मतदान केंद्रांवर म्हणजेच देशांतर्गत स्थलांतरीत मतदारांसाठी त्यांची नोंदणी झालेल्या स्वगृही मतदारसंघाच्या बाहेर मतदान केंद्रे स्थापित करून त्यांना दूरस्थ मतदान करणे शक्य होण्यासाठी निवडणूक आयोगाने काळाच्या कसोटीवर उतरलेल्या एम -३ प्रारुपाच्या इलेक्ट्रोनिक मतदान यंत्रांच्या सुधारित आवृत्तीचा उपयोग करण्याचा प्रस्ताव तयार केला आहे. त्यामुळे आपला मतदानाचा अधिकार बजावण्यासाठी मतदारांना त्यांची नोंदणी असलेल्या जिल्ह्यात जाऊन मतदान करण्याची गरज उरणार नाही.

देशांतर्गत स्थलांतरितांची परिभाषा, आदर्श निवडणूक आचारसंहितेचे कार्यान्वयन, मतदानानील गोपनीयतेची खातरजमा, मतदारांची ओळख पटविण्यासाठी मतदान प्रतिनिधींची व्यवस्था व दूरस्थ पद्धतीने झालेल्या मतदानातील मतांची मोजणी या न अन्य अनुषंगिक विषय व आव्हानांच्या बाबत निवडणूक आयोगाने (https://eci.gov.in/files/file/14714-letter-to-political-parties-on-

discussion-on-improving-voter-participation-of-domestic-migrant-using-remote-voting/) या जोडणीवर सर्व राजकीय पक्षांसाठी एक संकल्पना दस्तऐवज प्रेषित केला आहे.

| कायदेशीर आव्हाने | प्रशासकीय आव्हाने | तंत्रज्ञान विषयक आव्हाने |
|---|---|---|
| दुरुस्त करावे लागतील असे कायदे / नियम<br>- लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५० व १९५१<br>- निवडणूक संचालन नियम , १९६१<br>- मतदार नोंदणी नियम, १९६०<br><br>स्थलांतरित मतदार परिभाषित करणे<br>- मतदानाच्या दिवशी गैरहजर ते कायमस्वरूपी स्थलांतरित<br>- " सामान्य निवासी " व " " तात्पुरत्या गैरहजेरी " च्या संदर्भात मूळ जागी नोंदणी कायम ठेवणे.<br><br>दूरस्थ मतदान परिभाषित करणे<br>-प्रादेशिक मतदारसंघ संकल्पनेवर विचार विनिमय करणे<br>मतदारसंघ बाह्यता , जिल्हा बाह्य किंवा राज्य बाह्य अशा प्रकारच्या दूरस्थतेची परिभाषा तयार करणे, | - दूरस्थ मतदारांची गणना करणे - स्वयंघोषणा<br>- दूरस्थ स्थानी मतदानातील गोपनीयतेची खातरजमा करण्यासाठी नियंत्रित परिस्थिती उपलब्ध करुन देणे<br>- दूरस्थ मतदान केंद्रांवर मतदान प्रतिनिधींची व्यवस्था करणे आणि तोतयेगिरी टाळण्यासाठी मतदारांची ओळख सुनिश्चित करणे<br>- स्थापित करावयाच्या मतदान केंद्रांची संख्या व स्थान<br>- दूरस्थ मतदान केंद्रांसाठी व त्यावर संनियंत्रण ठेवण्यासाठी निवडणूक कर्मचारी वर्गाची नेमणूक<br>दूरस्थ स्थानी आदर्श निवडणूक आचारसंहितेचे कार्यान्वयन (इतर राज्ये) | - दूरस्थ मतदानाची पद्धत<br>- मतदानाच्या अशा पद्धतींशी मतदारांचा परिचय होणे - बहु - मतदारसंघीय दूरस्थ इलेक्ट्रोनिक मतदान यंत्र अथवा अन्य स्वरूपाचे तंत्रज्ञानाशी ओळख करुन देणे<br>- दूरस्थ स्थानी झालेल्या मतदानाची मोजणी करणे व त्याचे अन्य राज्यातील निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे प्रेषण करणे. |

देशांतर्गत स्थलांतरित झालेल्या मतदारांना त्यांच्या दूरस्थ स्थानावरून म्हणजेच शिक्षण / रोजगार इत्यादी प्रयोजनार्थ ते निवास करीत असलेल्या सद्य निवासाच्या स्थानावरून त्यांची नोंदणी झालेल्या मतदारसंघात मतदान करणे त्यांना शक्य होण्यासाठी निवडणूक आयोगाने सार्वजनिक क्षेत्रातील एका नामांकित उपक्रमाच्या सहयोगाने एक नमुना स्वरूपातील बहु - मतदारसंघीय दूरस्थ इलेक्ट्रोनिक मतदान यंत्र विकसित केले आहे. इलेक्ट्रोनिक मतदान यंत्राचा सुधारित नमुना एका वेळेस ७२ पर्यंत विविध मतदारसंघातील मतदान एकाच दूरस्थ मतदान केंद्रावर हाताळू शकतो वारंवार बदलावे लागणारे निवासस्थान / निवासाच्या जागा, स्थलांतर झालेल्या स्थानी सामाजिक व भावनात्मक आपलेपणाने जोडलेले नसणे, कायमस्वरूपी पत्ता / निवास / मिळकत असलेल्या मतदारसंघातील मतदार यादीतून नावे वगळण्याच्या बाबतीत असलेली उदासीनता इत्यादी अशा कारणामुळे मतदार नवीन स्थलांतरित झालेल्या मतदारसंघात आपले नाव नोंदविण्यास उत्सुक नसतात. . या उपक्रमाचे कार्यान्वयन झाल्यास स्थलांतरित मतदारांसाठी तो एक महत्वाचा सामाजिक बदल असेल व त्यामुळे ते त्यांच्या मूळ गावांशी / शहरांशी जोडलेले राहतील.

बहु - उद्देशीय दूरस्थ इलेक्ट्रोनिक मतदान यंत्राच्या नमुन्याचे प्रात्याक्षिक दाखविण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने सर्व मान्यताप्राप्त ८ राष्ट्रीय व ५७ प्रादेशिक राजकीय पक्षांना दि.१६.०१.२०२३ रोजी निमंत्रित केले आहे. सदर प्रात्यक्षिकाच्या वेळेस तांत्रिक तज्ञांच्या समितीचे सभासद सुद्धा उपस्थित असतील. त्याचप्रमाणे स्थलांतरित मतदारांना दूरस्थ स्वरूपाच्या मतदान करणे शक्य होण्यासाठी निवडणूक विषयक कायद्यात , प्रशासकीय प्रक्रियेत व मतदानाच्या पद्धतीत / तंत्रज्ञानात करावे लागणारे बदल इ. विविध मुद्यांबाबत भारत निवडणूक आयोगाने मान्यताप्राप्त राजकीय पक्षांचे लिखित स्वरूपातील अभिप्राय दिनांक ३१ जानेवारी २०२३ पर्यंत सादर करण्याचे आवाहन सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना केले आहे.

विविध हितसंबंधी राजकीय पक्षांकडून प्राप्त झालेले अभिप्राय व नमुना स्वरूपातील बहु - मतदारसंघीय दूरस्थ इलेक्ट्रोनिक मतदान यंत्राचे प्रात्यक्षिक आधारभूत मानून दूरस्थ मतदान पद्धत कार्यान्वित करण्याबाबत निवडणूक आयोग पुढील कार्यवाही करेल.

अनुज चांडक

संयुक्त संचालक ( माध्यमे )